# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


दिनांक 23/12/2023 (शनिवार) दुपार

---

### जिवानीशी ठार करण्याचा प्रयत्न करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध गुन्हा नोंद

पो.स्टे. जलालखेडा:— अंतर्गत १५ किमी अंतरावर जिल्हा परीषद शाळा जवळ घोगरा नरखेड येथे दिनांक २३/१२/२०२३ चे ०१.०० वा. ते ०१.३० वा. दरम्यान यातील फिर्यादी नामे— पंकज लखन गुजवार, वय ३३ वर्ष रा. घोगरा ता. नरखेड जि. नागपुर हा दि. २२/१२/२०२३ चे रात्री ०९.३० वा. आपले परीवारासह झोपी गेला असता फिर्यादीची आई लिलाबाई हि लग्वी करण्या करीता दरवाजा उघडून बाहेर गेली असता रात्री १.०० वा. ते १.३० वा. दरम्यान तिन ते चार ईसम अंदाजे वय ३५ ते ४० वर्ष असलेले फिर्यादीचे घरात आले व ‘‘तुझा वॉरंट आहे तु बाहेर चल’’ असे फिर्यादीला म्हणून घरा बाहेर आणले तेव्हा फिर्यादीची आई व पत्नी ओरडली असता, तेव्हा त्यातील एका इसमाने त्याचे जवळील असलेल्या चाकूने फिर्यादीचे छातीवर वार केला असता फिर्यादी यांनी त्यातील एका इसमाला लाथ मारून जोराने आवाज दिला असता, गावातील आजुबाजुचे लोक जमा झाल्याने सदर ईसम पळून गेले. फिर्यादीला गावातील लोकांनी पुढील उपचारा करीता पी. एस. सी. जलालखेडा येथे भर्ती केले येथे प्राथमिक उपचार करून फिर्यादीला पुढील उपचार कामी नागपूर मेडिकल कॉलेज येथे रेफर केले असुन जखमीचा पुढील वैद्यकीय उपचार सुरू आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. जलालखेडा येथे अनोळखी इसमांविरूध्द कलम ३०७, ४५२, ३४ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक शेंडे मो. नं. ९६३७५७८७६३ हे करीत आहे.

### जबरी संभोग करणाऱ्या आरोपीस अटक

पो.स्टे. उमरेड :— दिनांक ०३/०३/२०२३ ते दिनांक १९/१२/२०२३ चे १०.०० वा. ते ०१.३० वा. दरम्यान यातील फिर्यादी हिचे प्रेम प्रकरण **आरोपी नामे— रोशन फुलचंद चव्हाण, वय २१ वर्ष, रा. नाड** याचे सोबत सुरू असल्याने ते एकमेकांना चांगले ओळखत होते. दिनांक ०१/०१/२०२३ रोजी फिर्यादी ही शेतात जात असतांना फिर्यादीला थांबवुन फिर्यादीशी बोलायचे आहे असे म्हणुन फिर्यादीला त्यांनी आपल्या शेतात घेवुन गेला व आपण दोघे ही लग्न करू असे म्हणुन फिर्यादी सोबत जबरदस्तीने शारीरीक संबंध प्रस्थापीत केले तसेच १९/१२/२०२३ रोजी रात्री ०१/०० वा. दरम्यान सोनबा नगर दत्तवाडी नागपुर येथे नेवुन फिर्यादी सोबत शारीरीक संबंध केले आणि घरी कोणालाही काहीही सांगितले तर तुला मारून टाकिन अशी धमकी दिली फिर्यादी घाबरल्याने कुणालाही काहीही सांगितले नाही. परंतु दिनांक २२/१२/२०२३ रोजी सकाळी १०/०० वा. सुमारास आरोपीने फिर्यादीला बेसुर बसस्टॉपवर बोलाविल्याने फिर्यादी घरून गेली असता परत घरी आल्याने फिर्यादीच्या वडीलांनी विचारल्याने त्यांना घडलेली सर्व हकिकत सांगितली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. उमरेड येथे आरोपीविरुध्द कलम ३७६, ३७६ (२) (**n**), ३७६ (२) (**j**), ३७६ (२) (**f**), ३७६ (३) भादंवी ४, ६ बालकांचे लैंगिक अपराधापासून संरक्षण अधिनियम २०१२

कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीस अटक करण्यात आली असुन गुन्हयाचा पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक सुचिता मंडवाले मॅडम मो. क्र. ९७६३२३४५४८ या करीत आहे.

## विनयभंग

**पो.स्टे. रामटेक :-** दिनांक २२/१२/२०२३ चे १३.०० वा. ते १३.३० वा. दरम्यान यातील फिर्यादी ही घरातील बेडरूम मध्ये लेटली असता यातील **आरोपी नामे- मयुर चंदू बावणे, रा. काचुरवाही ता. रामटेक** हा फिर्यादीच्या घरात प्रवेश करून फिर्यादीने जोराने मामी पायनव असे म्हणून घरा बाजूच्या बाईला आवाज दिला असता आरोपी याने फिर्यादीची छेडछाड करून तोंड दाबले फिर्यादीचा पती हा तेथे आला असता आरोपी हा फिर्यादीच्या पतीला पाहून पळून गेला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. रामटेक येथे आरोपीविरुध्द कलम ३५४, ४५२ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक सोनटक्के मो. नं. ९४०५९०३५२८ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**

**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**